नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०१२
लक्ष्मी वि. विनया वगैरे
CNR No. MHSI080002002012

**निशाणी क्र.१३४ वर आदेश**

१. वादी तर्फे प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे. सदर कागदपत्रे हजर करणेस परवानगी मिळणेकरीता विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तूत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तूत अर्जास हरकत घेतली आहे.

२. अर्ज, वादीचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले.

३. यादी नि.क्र.१३५ प्रमाणे प्रस्तावित दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसते की, सदर कामी प्रतिवादी क्र.१अ विलास रमेश तळवडेकर यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप तसेच दस्ताचे स्वरुप बघता सदर दस्त हे उभय पक्षातील वादाच्या अनुषंगाने असल्याचे दिसून येते. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र.१३४ मंजूर करण्यात येतो.

२. वादीस कागदपत्रांची यादी नि.क्र.१३५ प्रमाणे कागदपत्र दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2024.10.10 16:54:03 +0530

( टी. एच. शेख )

दिनांकः१०/१०/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कणकवली.